
www.research-Chronicler.com

e-ISSN - 2347-503X
p-ISSN - 2347-5021

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67



# Research Chronicler

## International Multidisciplinary Research Journal

Vol. VI Spl. Issue IV November 2018

: Executive Editor :
Dr. Manjushri Bobade

: Editor-In-Chief :
Dr. Sanjay Nagarkar

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# Research Chronicler

A Peer-Reviewed Refereed and Indexed International Multidisciplinary Research Journal
Approved by University Grants Commission, New Delhi's

Volume VI Spl. Issue IV: November – 2018

## CONTENTS


| अ.क्र. | संदेश | | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. अनिल पाटील | शुभसंदेश | 1 |
| 2 | प्रिं. डॉ. भाऊसाहेब कराळे | शुभेच्छा | 2 |
| 3 | डॉ. मंजुश्री बोबडे | प्राचार्यांचे मनोगत | 3 |
| 4 | डॉ. संजय नगरकर | संपादकीय | 4 |

शोध निबंध

| अ.क्र. | लेखक | शोध निबंधाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य | 6 |
| 2 | प्राचार्य डॉ. सौ. शोभा इंगवले | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील प्रयोग | 9 |
| 3 | प्राचार्य डॉ. मंजुश्री बोबडे | सत्यशोधक कर्मवीर: कर्मवीर अण्णा | 16 |
| 4 | डॉ. जयश्री मगदूम व प्रा. मृदला कर्णी | रयत माऊली व कर्मवीर भाऊराव पाटील: सहजीवन व सहगाथा | 18 |
| 5 | प्रा. निलेश भा. वाकचौरे | पारंपरिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण- एक तुलनात्मक विचार | 21 |
| 6 | प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | भारतीय उच्च शिक्षणातील समस्या | 28 |
| 7 | प्रा. सुशील धसकटे | भाऊरावांनी 'रयत तालीम' | 32 |


283

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X



## संपादकीय...

महाराष्ट्राचा इतिहास ज्यांच्या नावाशिवाय लिहिलाच जाऊ शकत नाही, अशा महापुरूषांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्थान अद्वितीय आहे. लौकिक अर्थाने शिक्षणात अर्धे कच्चे, परंतु आधुनिक काळातील शिक्षणसम्राटांनाही लाजवेल अशी कामगिरी करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील आणि त्यांनी स्थापन केलेली 'रयत शिक्षण संस्था' यांच्यातील नाते अतूट व अद्वितीय आहे. शंभर वर्षांचा इतिहास व परंपरा लाभणे ही बाब उंबराच्या फुलासारखी आहे. म्हणूनच ४ ऑक्टोबर हा दिवस महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला आहे. सन १९१९ साली याच दिनी कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. आणि महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक वाटचालीला एक नवी कलाटणी दिली. ४ ऑक्टोबर २०१८ रोजी या घटनेला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाने या शंभर वर्षांच्या वाटचालीतील चढउतारांचा, संघर्षाचा व वर्तमानात संस्थेने केलेल्या प्रगतीचा लेखाजोखा मांडला जावा, कर्मवीरांच्या कार्यकर्तृत्वावर पुन्हा नव्याने प्रकाश पडावा व वर्तमान शैक्षणिक धोरणांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य संस्थेने कसे प्राप्त केले? या प्रश्नाचा वेध घ्यावा या उद्देशाने महाराष्ट्रभरातून विविध शिक्षणप्रेमी व कर्मवीरांच्या विचारांच्या विचारांची कास धरलेल्या अभ्यासकांकडून ''बदलती शैक्षणिक धोरणे व रयत शिक्षण संस्थेची वाटचाल'' या विषयावर शोधनिबंध आणि लेख मागविले. या शोधनिबंधांचे व लेखांचे संपादन असलेला हा विशेषांक आपल्या हाती देताना, आनंद द्विगुणित होत आहे.

या विशेषांकातील लेखांना केवळ माहितीच्या स्तरावर न ठेवता, विचारमंथनाच्या पटावर ठेवावे या उद्देशाने आपल्या हाती हे शब्दभांडार देत आहे. मी तर फक्त या शब्दभांडाराचा फक्त भारवाही आहे. कर्मवीरांनी रूजविलेली वैचारिक मूल्ये, राबविलेले शैक्षणिक धोरण, आणि हाच वारसा घेऊन पुढे वाटचाल करीत असलेली रयत शिक्षण संस्था आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणातही वटवृक्षासारखी खंबीरपणे उभी आहे. एवढेच नव्हे तर बदलत्या शैक्षणिक धोरणांनादेखील कवेत घेऊन पुढे जात आहे. याचाच प्रत्यय वाचकांना सदर विशेषांकातील लेख व शोधनिबंध वाचताना येईल.

# बदलती शैक्षणिक धोरणे आणि रयत शिक्षण संस्था

**डॉ. संजय नगरकर**

*मराठी विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंधगाव, पुणे*

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune 67

**पार्श्वभूमी –**

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.' 'ज्ञान हा तिसरा डोळा आहे.' असे मानणाऱ्या महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणिच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात आणणारे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दि.५ सप्टेंबर १९१९ रोजी काले येथे भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या अधिवेशनात 'रयत शिक्षण संस्थे' स्थापनेची घोषणा केली. दि.०४ ऑक्टोबर १९१९ रोजी प्रत्यक्षात संस्थेची स्थापना केली. आंग्ल काळापासून शिक्षण व्यवस्थेवर प्रभुत्व असलेल्या लॉर्ड मेकॉलेच्या पिरॅमिडला त्याद्वारे उलटे केले. खरे तर इंग्रजांनी आम्हाला शिक्षणाची चव दाखविली, परंतु शिक्षण व्यवस्थेच्या चाव्या पुन्हा उच्चवर्णियांच्याच हातात दिल्या. मेकॉलेच्या झिरपत्या सिद्धांताचा उद्देश कितीही उच्च आणि उदात्त असला तरी त्याची अंमलबजावणी करणारा संस्कृतिपूजक वर्ग त्या झिरपत्या सिद्धांताच्या छिद्रांमध्ये बसलेला होता. म्हणूनच या धोरणास सर्वप्रथम महात्मा फुले यांनी कडाडून विरोध केला. बहुजनांना शिक्षण आणि आधुनिक ज्ञानापासून हेतुपूर्वक दूर ठेवण्याचे प्रयत्न केले जात होते. त्याची झळ खुद्द महात्मा फुले यांनाही बसली होती. पुढे १८५४ साली वुडच्या खलित्यानुसार 'मॅग्नाचार्टा ऑफ इंडियन एज्युकेशन' हा सुधारणाविषयक कार्यक्रमही आखला गेला. त्याचा उद्देश 'प्रथम निरक्षरांना साक्षर करणे' हा होता. उद्देश कितीही उच्च आणि उदात्त असला तरी तो राबविणाऱ्यांच्या हेतूबाबत साशंकताच होती. १८५७ साली उच्च शिक्षणाची पायाभरणी करताना इंग्रजांनी एकाच वेळी मुंबई, मद्रास आणि कलकत्ता विद्यापीठांची स्थापना केली. परंतु मुळाचा विचार न करता शेंड्याचाच विचर करणाऱ्या इंग्रज सरकारची शिक्षणाची तरतूद ही प्राथमिक शिक्षणाबाबत उदासीन होती. त्यामुळेच महात्मा फुले यांनी १८८२ साली आलेल्या हंटर आयोगापुढे फिर्याद मांडताना मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. त्यापाठोपाठ दि.२ मार्च १८८२ रोजी राज्यरोहनासाठी आलेल्या पंचम जॉर्जसमोर शेतकऱ्याच्या वेशात जाऊन "हे येथे जमलेले हिरे-मोती आणि मौल्यवान वस्त्रे घातलेले लोक हिंदुस्थानचे खरे प्रतिनिधी नाहीत. खरा हिंदWस्थान खेडयात आहे. उपाशी, गरीब, बेघर, उघडा-नागडा असा आहे. त्याला शिक्षण देणे आवश्यक आहे. ही जाणीव आपली माता महाराणी व्हिक्टोरिया यांना करुन द्यावी" असे वास्तववादी व तळमळीचे निवेदन केले. अर्थात शिक्षणाची कवाडे उघडी करण्याचा इंग्रजांचा हेतूही फारसा शुद्ध नव्हता. त्यांना एक अनाहूत भीती वाटत होती. म्हणूनच लॉर्ड एलेनबरो ही भीती व्यक्त करताना म्हणतो, "खालच्या वर्गापासून शिक्षणाचा प्रारंभ केल्यास त्यांच्यात क्रांती घडून येईल."

**रयत शिक्षण संस्थेची स्थापनाः**

वरील सर्व पार्श्वभूमीवर महात्मा फुले यांच्या विचारांचा व कार्याचा तसेच आपल्या संस्थानात सामाजिक कार्याचा जागर करणारे व मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा प्रभाव कर्मवीर भाऊराव पाटलांवर पडला. मेकॉलेचा पिरॅमिड उलटा करुन त्यांनी तळागाळातल्या समाजाला शिक्षणाची पायवाट निर्माण करुन दिली. आयुष्यभर अनवाणी पायाने महाराष्ट्र पालथा घातला. 'रयत' असे अनुरुप नाव देऊन दि.४ ऑक्टोबर १९१९ रोजी स्थापन केलेल्या संस्थेचे व ज्ञानाच्या पायवाटेचे आज हमरस्त्यात रुपांतर झाले आहे. शतकाच्या उंबरठयावर असताना संस्था 'वटवृक्ष' या आपल्या बोधचिन्हाप्रमाणे खेडी-पाडी, डोंगर-दऱ्या, गाव-शहरे अशा सर्व प्रदेशात विस्तारली आहे.

285

आहे. परंतु रयत शिक्षण संस्था यास अपवाद आहे. कर्मवीरांनी त्याच काळात काळाची पावले ओळखून अनेक प्रयोग केले. काय आहे यापेक्षा काय घडू शकेल? याचा विचार करुन चारभिंतीसारख्या बरड माळरानाचे सुंदर बगिच्यात त्यांनी रुपांतर केले. आपल्या विद्यार्थ्यांकरवी शाळा उभ्या केल्या. या शाळांमधून बाहेर पडलेले लाखो विद्यार्थी हीच आज संस्थेची संपत्ती ठरली आहे." पाश्चात्य देशातील विद्यापीठे माजी विद्यार्थी चालवितात. त्याप्रमाणेच गेल्या शंभर वर्षात संस्थेने जी प्रगती केली आहे त्यामागे संस्थेच्या त्या त्या काळातील माजी विद्यार्थ्यांचे पाठबळदेखील कारणीभूत आहे. कर्मवीरांबरोबरच लक्ष्मीवहिनींचा असीम त्याग आणि समर्पणाचे संस्कार या विद्यार्थ्यांच्या मनावर होत असतात. तसेच एका जपानी म्हणीमध्ये म्हटल्याप्रमाणे 'तुम्ही जर एक वर्षाच विचार करीत असाल तर धान्य लावा! तुम्ही जर दहा वर्षाचा विचार करीत असाल तर वृक्ष लावा! आणि तुम्ही जर शंभर वर्षाच विचार करीत असाल तर माणसे पेरा!' या उक्तीप्रमाणे कर्मवीरांनी आयुष्यभर माणसे पेरली. जी माणसे निस्वार्थपणे संस्थेच्या मदतीला उभी राहिली.म्हणूनच आज संस्थेचा वेलू गगनावर गेला आहे.

जगातील सर्वाधिक मोठी लोकशाही प्रणाली असलेला देश म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. स्वातंत्र्य , समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांची कर्मवीरांनी नेहमीच प्रतिष्ठा राखली. तसेच लोकशाहीचा पाया मजबूत करायचा असेल तर त्यास शिक्षणाची आवश्यकता असते. दि.२६ सप्टेंबर १९४५ रोजी कोल्हापूर येथे भरलेल्या 'महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेसच्या' अधिवेशनात बोलताना, "कोणत्याही राष्ट्रसुधारणेचा व खऱ्या लोकशाहीचा पाया सार्वत्रिक शिक्षण प्रसार हाच आहे. हे विचारांती कोणासही पटेल. जोपर्यंत देशातील बहुजन समाज हा अज्ञानाच्या अंधःकारात चाचपडत आहे तोपर्यंत देशसुधारणेचा प्रयत्न करणे बहुतांशी पालथ्या घागरीवर पाणी ओतल्यासारखे नाही का होणार?" असे उद्गार त्यांनी काढले. तसेच जातीय विषमतेवर भाष्य करीत असताना, "हरिजन बांधवांची सुधारणा केवळ मंदिर प्रवेशाने अगर कायदे करुन होणार नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. व त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे." असे 'मानवता' मासिकास शुभसंदेश देताना लिहिले. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समतेचा त्यांनी केलेला हा पुरस्कार त्यांच्या द्रष्टेपणाचा प्रत्यय देतो.

**रयत शिक्षण संस्था : बदलती शिक्षण प्रणालीः**

रयत शिक्षण संस्थेचा आजवर झालेला प्रवास व प्राथमिक शिक्षणापासून. उच्चशिक्षणापर्यंत आखली गेलेली धोरणे यांचे वर्तमान परिस्थितीत परीक्षण करताना, आज नव्या पिढीला लोकशाही मूल्यव्यवस्थेची चाड नाही आणि राज्यकर्त्या पक्षांना शिक्षणाविषयी गांभीर्य नाही, अशी विसंगती निर्माण झालेली दिसते. मेकॉले, वुड, हंटर आयोगापासून सुरु झालेला हा प्रवास आज एका वेगळया वळणाजवळ येऊन पोहोचलेला आहे. एकीकडे मोफत व अत्यल्प दरात इंटरनेटला चालना देऊन 'डिजिटल इंडियाचा' बोलबाला आणि दुसरीकडे शिक्षणाच्या खाजगीकरणाला चालना देऊन शिक्षण क्षेत्रातील आर्थिक सहभागातून अंग काढून घेण्याचा प्रकार वाढीस लागला आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत देखील यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. मुदलीयार आयोग, कोठारी आयोग, सॅम पित्रोदा यांचे Knowledge Commission, २०१६ चे राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरण व पाठोपाठ महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायद्याची नव्याने अंमलबजावणी अशा एका एका संक्रमित अवस्थेत शिक्षणक्षेत्र आहे. काळानुरुप शिक्षणपद्धतीत बदल करणे आवश्यकच असते.परंतु बदलाच्या नावाखाली स्वायत्ततेला दिलेले प्राधान्य, खाजगी व कौशल्य प्रदाता संस्थांना प्रोत्साहन, अत्युच्च गुणवत्ता व रोजगाराभिमुख शिक्षण यांना महत्त्व यामुळे पारंपरिक शिक्षण देणाऱ्या संस्था-महाविद्यालयांसमोर नवे आव्हान व स्पर्धा निर्माण झालेली आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, उद्योग-व्यवसायाचे गट यात उतरत आहेत. रयत शिक्षण संस्थेने देखील पारंपरिक शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडण्यासाठी हे बदल स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

**सारांश:**

कर्मवीर या शिक्षण पंढरीच्या वारकऱ्याने पेरलेली मूल्ये, केलेला शिक्षणप्रसार व उलटा केलेला मेकॉलेचा

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67



286